मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२


# दिघी लईच भारी! माजी सैनिकांची नगरी

## आजी-माजी सैनिकांची संख्या पोचली अडीच हजारांवर : वारकरी नगरीसह सैनिक नगरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

दिघीमध्ये माजी सैनिकांची दुसरी पिढी गुण्यागोविंदाने नांदत दिघीच्या नावलौकिकात भर घालत आहे. दिघीमध्ये सध्या सुमारे अडीच हजार आजी-माजी सैनिकांसह सुमारे आठ हजार इतकी त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची संख्या आहे. त्यामुळे दिघी ही वारकरी नगरीसह सैनिक नगरीही होऊ पाहत



दिघीजवळ आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी इंजिनिअरिंग महाविद्यालय आहे. यामध्ये आजी-माजी सैनिकांच्या मुलांना प्रवेश दिला जातो. त्याचप्रमाणे आर्मी पब्लिक स्कूल, केंद्रीय शाळा, बॉम्बे सॅपर्स, लॉग रेंज बटालियन रायफल युनिट, बॅटल युनाकुलेट कँप, बोपखेलजवळ लष्करी अभियांत्रिकी महाविद्यालय आहे. त्याचप्रमाणे लष्करासाठी असलेले दवाखाने खडकी येथे आहेत. दिघीचा पूर्व, उत्तर, दक्षिण भाग लष्कराने व्यापला आहे.

दिघी हे पुणे-आळंदी पालखी मार्गावर वसले आहे. त्याचप्रमाणे १९८५ मध्ये येथील जमिनीचे भावही आवाक्यात असल्याने येथे माजी सैनिकांनी जागा घेऊन घरे बांधली. सध्या दिघी गावात सुमारे अडीच हजार आजी-माजी सैनिकांची घरे आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिकेद्वारे येथे माजी सैनिकांसाठी शहीद संतोष महाडीक भवन उभारण्यात आले आहे. या ठिकाणी माजी सैनिक विकास संघाद्वारे सैनिकांच्या उन्नतीसाठी कार्य केले जात आहे. त्याचप्रमाणे संघाद्वारे स्पर्धा परीक्षा केंद्रासह ग्रंथालयही चालवले जात आहे.

या ठिकाणी आजी-माजी सैनिकांच्या ६५ विद्यार्थ्यांच्या बैठकीची व्यवस्था करण्यात आली आहे. सैनिकांच्या देशभक्तीचे स्मरण करत, महापालिकेद्वारे माजी सैनिकांना पंधराशे चौरस फुटाच्या घराच्या घरपट्टीतूनही सवलत देण्यात आली आहे.

“ माजी सैनिकांमुळे दिघीच्या नावलौकिकात भर पडली आहे. सैनिकांमध्ये असणारी शिस्त आणि देशभक्तीने प्रेरित होत येथील तरुण-तरुणी वाटचाल करत आहेत. माजी सैनिक दिघीच्या प्रत्येक उत्सव, सामाजिक उपक्रमामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतात.

**- संजय गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ, दिघी.**

“ दिघी ही पुणे-आळंदी पालखी मार्गावर वसली आहे. सुमारे चाळीस वर्षांपूर्वी येथील जमिनीचे भाव सैनिकांच्या आटोक्यात असल्याने सैनिकांनी मोठ्या प्रमाणात येथे जमिनी खरेदी करून घरे बांधली. दिघी हे पुणे, पिंपरी-चिंचवड आणि परिसरात असणाऱ्या लष्करी भागात ये-जा करण्यासाठी सोईस्कर ठिकाण असल्याने माजी सैनिकांची दिघीला पसंती आहे.

**- ए. एच. भिसे, निवृत्त कॅप्टन, अध्यक्ष, माजी सैनिक सहकारी पतसंस्था, दिघी.**

“ दिघीजवळील परिसरात लष्करासंबंधित शासकीय कार्यालये आहेत. सैनिकांना निवृत्तीनंतर प्रशासकीय कामासाठी या कार्यालयांमध्ये जावे लागते. त्याचप्रमाणे सैनिकांच्या निवृत्तीनंतर पिंपरी-चिंचवड शहर परिसरात त्यांना दुसऱ्या टर्मसाठी हमखास नोकऱ्या उपलब्ध होत आहेत. त्याचप्रमाणे पुणे, पिंपरी-चिंचवड शहरात ये-जा करण्यासाठी दिघी हे मध्यवर्ती केंद्र असल्याने दिघीला माजी सैनिकांची पसंती आहे.

**- भास्कर आंब्रे, निवृत्त कॅप्टन, सचिव, माजी सैनिक विकास संघ.**

# नाशिक फाटा ते वाकड बीआरटीएस मार्गावर “वाहतूक कोंडी”

## माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांची उपाययोजना करण्याची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे सौदागर येथे नाशिक फाटा ते वाकड बीआरटीएस मार्गावर “वाहतूक कोंडी” होत असल्याबाबत माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांचे गुरुवारी लक्ष वेधले. पिंपळे सौदागर मधील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पीके चौक येथे अंडरपास तयार करावा अशी मागणी देखील त्यांनी यावेळी केली.



पिंपळे सौदागर मधील वाहतूक कोंडीसह विविध प्रलंबित प्रश्नांच्या मागण्यांसंदर्भात नाना काटे यांनी गुरुवारी आयुक्त शेखर सिंह यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी आयुक्तांना लेखी निवेदन दिले आहे. यात त्यांनी स्वराज गार्डन चौक येथील गार्डनचे आरक्षण बदलून त्या ठिकाणी जलतरण तलाव व बॅडमिंटन हॉल उभारण्यात यावा. अशी मागणी देखील केली आहे.

पिंपळे सौदागर येथील वाहतूक कोंडी संदर्भात नाना काटे यांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.२८ रहाटणी पिंपळे सौदागर येथील नाशिक फाटा ते वाकड या बी आर टी ऐस मार्गावरील पी के चौक येथे नागरिकांना सततच्या वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. या मार्गावर हिंजवडी, वाकड, पुणे येथे कामानिमित्ताने जाणाऱ्यांसाठी हा सोपा मार्ग असल्याने या मार्गाचा नागरिक मोठ्या प्रमाणात वापर करतात. तसेच जवळ असणार्या भोसरी, चाकण, खेड औद्योगिक परिसरातील मोठे मालवाहतूक करणारी वाहने देखील या मार्गाचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. त्यामुळे पी के चौक येथे सातत्याने वाहतूक कोंडी होत असते आणि यामुळे आत्ता पर्यंत अनेक छोटे मोठे अपघात या चौकात झालेले आहेत. त्यामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासामधून सुटका होण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.

# जितेंद्र डूडी पुण्याचे नवे जिल्हाधिकारी

## डॉ. सुहास दिवसे यांची जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख (पुणे) या पदावर पदोन्नती

**पुणे | प्रतिनिधी**

प्रशासकीय सेवेतील आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव व्ही. राधा यांच्या आदेशान्वये हे आदेश पारीत करण्यात आले आहेत. त्यामध्ये, पुण्याचे जिल्हाधिकारी आणि माजी आयएएस अधिकारी पूजा खेडकर प्रकरणामुळे चर्चेत आलेल्या डॉ. सुहास दिवसे यांना पदोन्नती देत त्यांची बदली करण्यात आली आहे. दिवसे यांच्याजागी साताऱ्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांना पदभार देण्यात आला आहे. तर, साताऱ्याच्या जिल्हाधिकारीपदी पुण्यातील जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या आदेशान्वये राज्यातील 10 आएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून काहींना पदोन्नती प्रमोशन देण्यात आलं आहे.



पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांना पदोन्नती देण्यात आली असून भूमी अभिलेख विभागाच्या जमाबंदी आयुक्तपदी कररण्यात आली आहे. "आपणांस भारतीय प्रशासन सेवेच्या अधिकालिक वेतन श्रेणीत पूर्वलक्षी प्रभावाने दिनांक 1 जानेवारी 2025 पासून पदोन्नती देण्यात येऊन, पदोन्नतीनंतर आपली नियुक्ती जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे या रिक्त पदावर करण्यात येत आहे. आपल्या जागी जितेंद्र डूडी, भाप्रसे यांची नियुक्ती केली आहे. तरी आपण आपल्या सध्याच्या पदाचा कार्यभार जितेंद्र डूडी, भाप्रसे यांच्याकडे सोपवून नवीन पदाचा कार्यभार निरंजन कुमार सुधांशु, भाप्रसे यांच्याकडून त्वरीत स्वीकारावा," असे परिपत्र जारी करण्यात आले आहे.

दरम्यान, बोगस प्रमाणपत्राचा वापर करुन आयएएस पदावर विराजमान झालेल्या माजी सनदी अधिकारी पूजा खेडकर यांनी जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांच्यावर विनयभंगाचे आरोप केले होते. मात्र, दिवसे यांनी हे सर्व आरोप फेटाळत पूजा खेडकर यांचा बनाव असल्याचे म्हणत अब्रू नुकसानीचा दावा दाखल केला होता.

साताऱ्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची पुण्याचे कलेक्टर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शासनाने आपली बदली केली असून, आपली नियुक्ती, जिल्हाधिकारी, पुणे या पदावर डॉ. सुहास दिवसे, भाप्रसे यांच्या जागी ते पद वरिष्ठ समय श्रेणीत अवनत करून केली आहे. आपल्या जागी श्री. संतोष पाटील, भाप्रसे यांची नियुक्ती केली आहे. तरी, आपण आपल्या सध्याच्या पदाचा कार्यभार विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांच्या सल्ल्याने अन्य अधिकाऱ्याकडे सोपवून, नवीन पदाचा कार्यभार डॉ.दिवसे, भाप्रसे यांच्याकडून त्वरीत स्वीकारावा, असे पत्र अवर सचिव व्ही. राधा यांनी जारी केले आहे.

### संतोष पाटील साताऱ्याचे जिल्हाधिकारी

» पुण्यातील जिल्हा परिषद सीईओ संतोष पाटील यांची सातारा जिल्हाधकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शासनाने आपली बदली केली असून, आपली नियुक्ती, जिल्हाधिकारी, सातारा या पदावर श्री. जितेंद्र डूडी, भाप्रसे यांच्या जागी केली आहे. तरी, आपण आपल्या सध्याच्या पदाचा कार्यभार विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांच्या सल्ल्याने अन्य अधिकाऱ्याकडे सोपवून, नवीन पदाचा कार्यभार त्वरीत स्वीकारावा, असे बदली आदेश पारीत करण्यात आले आहेत.

# दाऊदी बोहरा समाजातर्फे "सैफी बुरहानी बिझनेस एक्सपो"

## मुर्तजा जसदानवाला यांची माहिती : व्यावसायिकतेला प्रोत्साहन देण्याचा उद्देश


**पुणे | प्रतिनिधी**

दाऊदी बोहरा समाजातर्फे ४ ते ६ जानेवारी दरम्यान येरवडा स्थित डेक्कन कॉलेज ग्राऊंड वर भव्य चौथे सैफी बुरहानी बिझनेस एक्सपो २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. विविध प्रकारच्या उद्योग-व्यवसायांमधील लोकांना एकदुसऱ्यांशी कनेक्ट करून व्यावसायिकतेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या बिझनेस एक्स्पोचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मुर्तजा जसदानवाला यांनी दिली.

अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले की, तीन दिवस आयोजित या एक्स्पोमध्ये एमएसएमईज, मॅन्यूफॅक्चरर्स, स्टार्टअप्स, आयटी कंपन्या, वुमेन एन्टरप्रेन्योर, रिटेलर्स, रिअल इस्टेट डेव्हलपर्स, सर्व्हिस प्रोव्हायडर, एज्युकेशनल इन्स्टीट्यूट्स, हेल्थकेअर आणि वेलनेस प्रोफेशनल्स सह विविध क्षेत्रातील दाऊदी बोहरा समाजाचे उद्योजक आणि व्यावसायिकांचे जवळपास १७० स्टॉल्स येथे असणार आहेत. एक्सपो मध्ये देश-विदेशातून येणाऱ्या दाऊदी बोहरा समाजाच्या लोकांसह हजारो नागरिक यामध्ये सामिल होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दाऊदी बोहरा समाज व्यापार-उद्योग करताना आपली सामाजिक जबाबदारीदेखील चांगल्याप्रकारे निभावत असतो. त्यामुळे बिघडत्या पर्यावरणाला सावरण्यासाठी एक्स्पोमध्ये येणाऱ्या प्रत्येकाला एक रोपटे भेट दिले जाणार आहे. अशाप्रकारे या एक्स्पोदरम्यान सुमारे ५० हजार झाडांचे वितरण करण्यात येणार आहे.

महोत्सवासाठी अनेक गणमान्य व्यक्तींनाही आमंत्रित करण्यात आले आहे. यामध्ये पुण्याचे खासदार तथा केंद्रीय नागरी उड्डयन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, पुणे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष फतेचंद रांका, महेंद्र पितालिया, पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्यासह उद्योग-व्यवसाय आणि राजकीय क्षेत्रातील हजारो मान्यवरांना आमंत्रित करण्यात आले आहे. या एक्स्पोमध्ये नागरिकांनी लाखोंच्या संख्येने भेट द्यावी, असे आवाहन मुर्तजा जसदानवाला यांनी केले आहे.



# प्रदूषित इंद्रायणी नदीचा मुद्दा तापला

## कारखाने, गृहप्रकल्प तसेच पालिकेच्या मैला शुद्धीकरण प्रकल्पाची पाहणी करा

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या सहा ते सात महिन्यांपासून आळंदीमध्ये इंद्रायणी नदी फेसाळत आहे. मध्यंतरी तत्कालिन मुख्यमंत्री आणि आताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी इंद्रायणीच्या प्रदुषणावरून अधिकाऱ्यांना धारेवर धरले होते. तसेच नदी प्रदुषणमुक्त करण्याच्या सूचना केल्या होत्या. यानंतर काही प्रमाणात नदीचे फेसाळणे थांबले होते. पुन्हा आता नदी फेसाळल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.





> इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना येत्या १० दिवसात कराव्यात. अन्यथा शिवसेनेच्या वतीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयात आंदोलन छेडण्यात येईल.
>
> **- इरफानभाई सय्यद, शिवसेना उपनेते तथा कामगार नेते.**

शिवसेना उपनेते तथा कामगार नेते इरफानभाई सय्यद यांनी वारंवार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (एमपीसीबी) अधिकाऱ्यांना कार्यवाहीबाबत निवेदन दिले आहे. परंतु, प्रशासन केवळ पावले उचलत असल्याचा आव आणत आहे. प्रत्यक्षात नदी वारंवार फेसाळत असल्याने नदीची अवस्था जैसे थे आहे. याबाबत शिवसेना उपनेते तथा कामगार नेते इरफानभाई सय्यद यांनी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाबाबत पुन्हा एकदा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास नुकतेच स्मरणपत्र दिले आहे. इंद्रायणी नदीकाठी असणारे कारखाने, गृहप्रकल्प तसेच महापालिकेच्या मैला शुद्धीकरण प्रकल्पाची पाहणी करावी. तसेच जबाबदार घटकांवर फौजदारी खटले दाखल करावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

पत्रकात त्यांनी म्हटले आहे की, लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाचा विषय दिवसेंदिवस गंभीर होत आहे. शनिवारी (दि. २१) रोजी पुन्हा एकदा इंद्रायणी नदीचे पाणी प्रदूषित आणि फेसाळलेले दिसून आले. त्यामुळे स्थानिक प्रशासन आणि प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यावर कार्यपद्धतीवर भाविक भक्तांच्या मनात शंका निर्माण होत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतून इंद्रायणी नदीत थेट मैला मिश्रित सांडपाणी आणि उद्योगाचे केमिकल रसायन मिश्रित दूषित पाणी थेट इंद्रायणी नदीत येत आहे. नदी प्रदूषण स्थानिक नागरिक आणि भाविकांच्या आरोग्याला हानिकारक आहे. याबाबत गेल्या वर्षी शिवसेना पक्षाच्या वतीने निवेदन देण्यात आले. त्यावर कोणतेही कार्यवाही झालेली नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने इंद्रायणी नदीकाठी असलेले सर्व कारखाने, गृहप्रकल्प, तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मैला शुद्धीकरण प्रकल्पाची पाहणी करावी. इंद्रायणी नदी प्रदूषणाला जबाबदार तसेच थेट पद्धतीने मैला अथवा रसायन मिश्रित सांडपाणी इंद्रायणीत सोडणाऱ्यांवर फौजदारी खटले दाखल करावेत. महापालिका हद्दीतील गृहप्रकल्पातील बेकायदेशीरपणे मैलमिश्रित पाणी नदीत सोडणाऱ्या आणि या गृहप्रकल्पांना परवानगी देणाऱ्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवरसुद्धा प्रसंगी फौजदारी खटले दाखल करावे, असे या पत्रकात इरफानभाई यांनी म्हटले आहे.

# आमदार शंकर जगताप ‘अॅक्शन मोड’वर!

## चिंचवड मतदार संघातील विविध विकासकामांना गती देण्यासाठी घेतली बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभेचे नागपूर हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर भाजपचे शहराध्यक्ष व चिंचवडचे आमदार शंकर जगताप ‘अॅक्शन मोड’वर असल्याचे पाहायला मिळत आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघातील विकासकामे आणि मूलभूत सुविधांशी संबंधित अडचणींवर चर्चा करण्यासाठी त्यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त व प्रशासक शेखर सिंह यांच्या समवेत एक महत्त्वाची बैठक घेतली. या बैठकीला चिंचवड मतदारसंघातील माजी नगरसेवक देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते.



> चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या प्रलंबित विकासकामांना गती देऊन नागरिकांना मूलभूत व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधींनी सक्रिय भूमिका घेण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला.
>
> **- शंकर जगताप, आमदार, चिंचवड .**

गाजवले पहिलेच अधिवेशन..

विधानसभा निवडणूक झाल्यानंतर झालेल्या नागपूर अधिवेशनात निव्वळ पूररेषेतील बांधकामांसह मतदारसंघातील विविध प्रश्नांवर आवाज उठवत आमदार जगताप यांनी अधिवेशन गाजवले. वाहतूक समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन रस्त्यावर उतरत त्यांनी अधिकाऱ्यांना उपाययोजनांच्या आदेश दिले होते. त्या पाठोपाठ आयुक्तांसमवेत बैठक घेत आमदार जगताप यांनी मतदारसंघातील विकासकामांना गती दिली.

बैठकीत चर्चा झालेले मुद्दे..

कचरा व्यवस्थापन व स्वच्छता : शहरातील कचऱ्याचे प्रभावी व्यवस्थापन आणि रस्त्यांची नियमित स्वच्छता.

पाणीपुरवठा व विद्युत समस्या : कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा आणि वारंवार येणाऱ्या विद्युत समस्यांवर तातडीने उपाययोजना.

वाहतूक कोंडी व रस्ते सुधारणा : वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी नवीन प्रकल्पांना गती.

फुटपाथवरील अतिक्रमण : पादचाऱ्यांच्या सोयीसाठी अतिक्रमण हटवून फुटपाथची योग्य देखभाल.

महत्त्वाचे प्रकल्प व निर्णय..

बटरफ्लाय ब्रिज : रखडलेला प्रकल्प पूर्ण करण्याचे निर्देश.

पिंपळे सौदागरचा जुना पूल : काम तातडीने सुरू करण्याची सूचना.

वाकड दत्त मंदिर रस्ता : प्रलंबित रस्त्याचे काम गतीने पूर्ण करणे.

शाफ्ट तंत्रज्ञानाचा वापर : पाणीपुरवठा सुधारण्यासाठी आयआयटीच्या तंत्रज्ञानाचा तातडीने वापर.

मोकाट कुत्र्यांवर नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना.

बेकायदेशीर नळ कनेक्शनवर कारवाई.

स्थापत्य, ड्रेनेज व पाणीपुरवठा विभागासाठी पुरेशी बजेट तरतूद.

बैठकीला माजी महापौर माई ढोरे, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, भाजपचे चिंचवड विधानसभा अध्यक्ष काळूराम बारणे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके तसेच माजी नगरसेविका माधुरी कुलकर्णी, अश्विनी चिंचवडे, चेतन भुजबळ, सुरेश भोईर, राजेंद्र गावडे, नीता पाडाळे, ज्योती भारती, अभिषेक बारणे, तानाजी बारणे, संदीप गाडे, सिद्धेश्वर बारणे, आरती चोंधे, निर्मला कुटे, सागर अंघोळकर, वैशाली जवळकर, महेश जगताप, हर्षल ढोरे, संतोष कांबळे, शारदा सोनावणे, शेखर चिंचवडे, राहुल जवळकर, हर्षद नढे, हिरेन सोनावणे, संकेत चोंधे, विलास पाडाळे आणि संकेत कुटे आदी उपस्थित होते.

# केवळ 74 सीसीटीव्हीवर रेल्वे स्थानकाची भिस्त

## महापालिकेच्या मिळकतकराची थकबाकी भरण्याकडे दुलर्क्ष करणे पुणेकरांना चांगलेच भोवणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे रेल्वे स्टेशनवर अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी मंजुरी मिळून नऊ महिने होऊन गेले तरी अद्याप सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले नाहीत. त्याची निविदानंतरची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे पुणे रेल्वे स्टेशनची सुरक्षा भक्कम कधी होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.




पुण्यातून दररोज ७२ आणि स्थानकावरून २०० रेल्वे गाड्या धावतात. तसेच रोजगाराच्या संधीमुळे बाहेरील राज्यातून पुण्यात येणाऱ्या तरुण-तरुणींची संख्या मोठी आहे. तसेच लांब पल्ल्याच्या ठिकाणी जाणाऱ्या गाड्यांची संख्या जास्त आहे. या वाढत्या प्रवाशांची संख्या पाहता स्थानकावर उपलब्ध असलेली सुविधा अपुरी ठरत आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासनाकडून प्रवाशांच्या हिताच्या दृष्टीने सोयीसुविधा निर्माण करणे गरजेचे आहे. तसेच, लोणावळा ते दौंड मार्गावर लोकल वाहतूक येथून दररोज सुरू असते. त्यामुळे पुणे रेल्वे स्टेशनवर नेहमीच गर्दी असते. त्यामध्ये पॉकेटमार, मोबाईल हिसकावणे व इतर प्रकारचे गुन्हेदेखील घडतात. तसेच, अपहरण व लैंगिक अत्याचाराचे प्रकारदेखील यापूर्वी पुणे रेल्वे स्टेशन परिसरात घडले आहेत. त्यामुळे अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी केली जात होती. परंतु, त्याचे काम मात्र संथ गतीने सुरू आहे.

**प्रवासी सावध होण्याची गरज...**

पुणे स्थानकावर येणाऱ्या प्रवाशांकडून आलेल्या अनेक अडचणी सोडविण्यासाठी जिवाचा आटापिटा केला जातो. त्यामुळे अनेकांची मदत घेतली जाते. परंतु, मदत घेताना आपली फसवणूक तर होत नाही ना? याची काळजी घेणे हे प्रवाशांच्या दृष्टीने हिताचे ठरेल.

### केवळ 74 सीसीटीव्ही कॅमेरे

» पुणे रेल्वे स्टेशन येथे सध्या ७४ सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत आहेत. ते बसवूनदेखील काही वर्षे उलटली आहेत. त्यामुळे नव्याने ४६ सीसीटीव्ही बसविण्याचा निर्णय झाला आहे. यामध्ये आरोपींचा चेहरा ओळखतील असे सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहेत. गेल्या दीड ते दोन वर्षांपासून सीसीटीव्ही बसविण्याची चर्चा सुरू आहे. आता सीसीटीव्ही बसविण्यास मंजुरी मिळाल्याचे मार्च महिन्यातच रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले होते. पण, अद्याप तरी पुणे रेल्वे स्टेशन परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसलेले नाहीत.

### स्थानकावरील स्थिती

- » दैनंदिन प्रवासी संख्या - दीड लाख
- » ये-जा करणाऱ्या गाड्या - २००
- » पुण्यातून सुटणाऱ्या गाड्या - ७२
- » एकूण सीसीटीव्ही संख्या - ७४
- » नवीन प्रस्तावित सीसीटीव्ही

# द्राक्षांचा हंगाम यंदा उशिरानेच

## द्राक्ष उत्पादनाला पावसाचा फटका : पाऊस लांबल्याने महिनाभर विलंबाने बाजारात आवक

**पुणे | प्रतिनिधी**

द्राक्ष उत्पादनाला यंदा लांबलेल्या पावसाचा फटका बसला आहे. एक महिना विलंबाने हंगाम सुरू झाला आहे. मार्केट यार्डातील फळ विभागात तुरळक आवक सुरू झाली आहे. एप्रिलपर्यंत हंगाम सुरू राहणार असल्याची माहिती व्यापारी अरविंद मोरे यांनी दिली.



येथील बाजारात मंगळवारी ४०० ते ५०० क्रेट द्राक्षांची आवक झाली. एका क्रेटमध्ये नऊ किलो द्राक्षे असतात. काळी म्हणजे जम्बो द्राक्षांची जिल्ह्यातील बारामती आणि सातारा जिल्ह्यातील फलटण भागातून आवक होत आहे. तर सांगली जिल्ह्यातून पांढऱ्या द्राक्षांची म्हणजे तास-ए-गणेशची आवक होत आहे.

काही दिवसांपासून येथील बाजारात हंगामपूर्व द्राक्षांची आवक होत होती. मात्र, ही हंगामतील द्राक्षे आहेत. पावसामुळे नुकसान झाल्याने यंदा नेहमीच्या तुलनेत ५५ ते ६० टक्केच उत्पादन होण्याचा अंदाज आहे. तरीही भाव टिकून राहण्याचा अंदाज आहे.

स्थानिक ग्रामस्थ व एकविरा देवस्थान ट्रस्टच्या सदस्यांनी जखमींना तत्काळ गडावरून खाली आणले आणि प्रथमोपचार केले. काही भाविकांना उपचारासाठी दवाखान्यातही हलविण्यात आले. काही कालावधीनंतर एकविरा मंदिर परिसरातील परिस्थिती पूर्ववत झाली. अतिउत्साही भाविक आणि नियोजनाचा अभावामुळे अशा घटना घडत असतात. त्यामुळे गडावर फटाका बंदीची कडक अंमलबजावणी करावी, अशी मागणी होत आहे.

### पर्यटन स्थळांहून मागणी

» बाजारात दाखल होणाऱ्या द्राक्षांना मोठा उठाव आहे. सध्या नववर्ष स्वागतासाठी पर्यटकांनी पर्यटन स्थळी गर्दी केली आहे. त्यामुळे गोवा, लोणावळा, माथेरान, महाबळेश्वर, वाई, पाचगणीसह विविध पर्यटनस्थळांहून मागणी आहे. याबरोबरच स्थानिक बाजारपेठांसह गुजरात, बंगळुरू, कोलकाता येथून द्राक्षांना मोठी मागणी आहे.

घाऊक बाजारातील दर्जानुसर भाव

जम्बो (काळी द्राक्षे) – ९ किलो – ६००-१२००

तास-ए-गणेश (पांढरी द्राक्षे) – ९ किलो – ५००-११००

> दर्जेदार मालाला शेतातच मागणी आहे. मात्र, हा माल बाजारात आल्यास त्याला किलोमागे ५ ते १० रुपये जास्त भाव मिळू शकतो. तसेच, बाजार समितीच्या अखत्यारित माल आल्याने शेतकऱ्यांचे पैसे बुडण्याची शक्यता नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी बाजार आवारातच माल विक्रीसाठी आणावा.
>
> - अरविंद मोरे, द्राक्षांचे व्यापारी, मार्केट यार्ड.